# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,मंगळवारी बाजार सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रमांक: २५६५१४३ E-mail : ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्रमांक:०७१२–२५६१६६३

अतितात्काळ

क्रमांक : तंशिसं/प्राकाना/शैवि–३/२०१२/ 957

दिनांक : – 2 APR 2012

प्रति,

प्राचार्य/संचालक,

........................

........................

(सर्व अभियांत्रिकी/औषधिनिर्माण/एमबीए/एमसीए पदवी व पदव्युत्तर महाविद्यालय).

विषय :– व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध ठरल्याची माहिती देणेबाबत....

संदर्भ :– १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३२५/११)/ तांशि–४, दिनांक २९/३/२०१२

२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२अ/ एडीएम/२०१२/४४९, दि. २/४/२०१२

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यांत येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जात वैधता अनिवार्य करण्यासंदर्भात विधानपरीषद सभागृहामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचेसोबत मा. मंत्री, सामाजिक न्याय आणि मा. मंत्री आदिवासी विकास विभाग यांची दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता बैठक होणार आहे.

त्यासाठी आपल्या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या सामाजिक मागास विद्यार्थ्यांची संख्या, जात पडताळणी अवैध ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, परिणामी प्रवेश रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या याबाबत शैक्षणिक वर्ष २००९–१०, २०१०–११ व २०११–१२ या वर्षाची तपशिलवार माहिती **उदया दिनांक ३/४/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास **फॅक्सद्वारे** त्वरीत कळविण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

नागपूर

प्रत :– प्रोग्रामर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. त्यानी सदरहु पत्र वेबसाईटवर अपलोड करावे व सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना ई–मेल करावा.